# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 29/12/2022 (गुरूवार) दुपार

---

## घरफोडी गुन्हयातील आरोपी जेरबंद

## 06 गुन्हे उघडकीस

## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई

दिनांक २५/१२/२०२२ चे १८.०० वा. ते दिनांक २६/१२/२०२२ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— संदिप माणिकराव मुरमे, वय ३८ वर्ष, रा. वार्ड नं. ३, पाचगाव, ता. उमरेड यांचे प्रॉपर्टी ऑफिसच्या शटरचे लॉक तोडुन आत मध्ये प्रवेश करून काउंटरचे लॉक तोडुन ५०,०००/—रू. नगदी व वॉलला फिट केलेली एल. ई. डी. किंमती अंदाजे १०,०००/— रू. ची तसेच ऑफिसच्या बाजुचे नामे— शंकर मारोती नांदुरकर याच्या दुकानाचे शटरचे लॉक तोडुन आत प्रवेश करून काउंटरमधील १३,५००/— रू. तसेच रोशन शाह यांचे दुकानाची लोखंडी खिडकी तोडुन काउंटरमधील नगदी ३०,५००/— रू. तसेच मनप्रितसिंग जसन योच इंजिनिअरिंग कपंनीचे ऑफिसच्या शटरचे लॉक तोडुन चोरी करण्याचा प्रयत्न कोणीतरी अज्ञात चोराने एकुण १,०४,००० रूपयाचा मुद्देमाल मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले. अशा फिर्यादीच्या रीपोर्ट वरून पो.स्टे. कुही येथे अप. क्र. ५४३/२२ कलम ४५७, ३८० भादवि. अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाचा समांतर तपासात मा. पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने दिनांक २८/१२/२०२२ रोजी उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन कुही येथील अप. क्र. ५४३/२२ कलम ४५७, ३८० भादवि. च्या गुन्हयात समांतर तपास करीत असता मुखबिरकडुन गोपनिय माहिती मिळाली की, गुन्हयात चोरी केलेली रोख रक्कम तसेच गुन्हयात वापर करण्यात आलेली कार क्र. MH37 A1400 हा असून ती गाडी कळमना पाचगाव हद्दीत संशयीतरीत्या फिरत आहे. अशी गोपनीय माहिती मिळाल्याने सदर कारला नाकाबंदी करून पकडून गाडी मधील आरोपी नामे— १) मुकेश रघुनाथ जाभुळकर, वय २८ वर्ष, रा. राणी दुर्गावती चौक नागपूर २) नुतन गेंदलाल स्वर्थोक, वय २६ वर्ष, रा. राणी दुर्गावती चौक नागपूर यांना ताब्यात घेवुन पाचगाव येथे झालेल्या दुकान फोडी बाबत सखोल विचारपूस केली असता त्याने सांगितले की, पाचगाव येथील चार घरफोडी करून रोख रक्कम चोरी केल्याचे सांगितले. तसेच मौदा, कन्हान रामटेक अरोली येथे सुद्धा घरफोडी केल्याचे सांगितल्याने यातील दोन्ही आरोपीस ताब्यात घेवुन त्यांचे कडुन गुन्हयात चोरी केलेले रोख रक्कम जप्त करून खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आणले. उघडकीस आणलेले गुन्हे अ) १) पोस्टे मौदा अप. क्र. ६९४/२२ कलम ४५७, ३८० २) अप. क्र. ७१८/२२ कलम ४५७, ३८० ब) पोस्टे अरोली १) अप क्र. १९७/२२ कलम ४५७, ३८० क) पोस्टे कन्हान अप क्र. १) ६४१/२२ कलम ४५७, ३८० ड) पोस्टे रामटेक १) अप. क्र. ७०९/२२ कलम ४५७, ३८० असे एकुण ०६ गुन्हे उघडकीस आणले. सदर आरोपीतांना ताब्यात घेवुन आरोपीतांकडुन कार क्र. MH37 A1400 किंमती ३,००,०००/—रू. नगदी रोख १०,०००/— असा एकुण ३,१०,०००/—रू. चा मुद्देमाल पुढील योग्य कायदेशीर कारवाईस्तव पोलीस स्टेशन कुही यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांचे नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक श्री. राजीव कर्मलवार, श्री. जितेंद्र वैरागडे पोलीस हवालदार मदन असतकर, नरेंद्र पटले, अरविंद भगत, पोलीस नाईक अजिज दुधकानोज, बालाजी साखरे चालक पोलीस हवालदार पाटील तसेच सायबर सेलचे पोलीस नायक सतिश राठोड तसेच पोलीस निरीक्षक विवके सोनवणे, पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके पोलीस स्टेशन कुही यांनी पार पाडली.




---

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत गहुँ हिवरागाव जवळ ता. पारशिवनी येथे दिनांक २७/१२/२०२२ चे १९.३० वा. ते २०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रोहन विजु दुबे, वय २८ वर्ष, रा. रेल्वे स्टेशन पंचायत समीती समोर ताज दरगाह चे बाजूला कामठी हा कबाडी वेचण्याचे काम करीत असून नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी हा त्याच्या मोहल्ल्यातील १५ बाया व मुलां सोबत ॲटो क्र. एम. एच–४० बी. एफ.–१७८८ ने निमखेडा येथे कबाडी वेचून तेथून त्याच्या मोहल्ल्यातील लोकांसह निमखेडा चाचेर मार्गे गहुहिवरा कडुन कामठी कडे येत असता काही यातील आरोपी अनोळखी १५ इसमांनी फिर्यादी व त्याच्या सोबत असलेल्या मोहल्ल्यातील लोकांवर चोर असल्याचे संशयावरून त्याचे ॲटो समोर गहूँहिवरा गावाजवळ ट्रॅक्टर रोडवर आडवा लावून त्याचे ॲटो थांबविले आणि तेथे जमलेले गहूहिवरा गावातील १० ते १५ लोकांनी फिर्यादी व त्याचे सोबतचे लोक चोर असल्याचे संशयावरून फिर्यादी व त्याच्या सोबत च्या लोकांना लाठी, काठी व हातबुक्क्याने मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम ३४१, १४३, १४७, १४९, ३२४, ३२३ भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ३८१ गुरूप्रकाश मेश्राम पोलीस स्टेशन कन्हान मो. क्र. ७३५०९८५३७३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**